ब) संचालक मंडळाच्या सर्व सभांचे अध्यक्षपद अध्यक्षच भुषवतील. अध्यक्षांचे गैरहजेरीत सभांचे अध्यक्षपद उपाध्यक्ष भुषवतील आणि दोघांचेही गैरहजेरीत संचालक मंडळातील सदस्य आपल्यातून एकाची अध्यक्ष म्हणून निवड करतील.

क) सभेच्या अध्यक्षांना स्वत:च्या मताव्यतिरिक्त निर्णायक मत राहील. सदर निर्णायक मताचा वापर समान मते पडल्यास करता येईल.

ड) कार्यलक्षी संचालकांना अध्यक्ष/उपाध्यक्ष यांच्या निवडणूकीमध्ये मतदान करण्याचा अधिकार असणार नाही.

**४२) अध्यक्ष व उपाध्यक्ष यांचे अधिकार व कामे :**

१) अध्यक्षांना खालील अधिकार व कार्ये पार पाडावी लागतील.

अ) साधारण सभा, संचालक मंडळ सभा व अन्य दोन उपसमिती सभा यांचे अध्यक्ष पद भुषविणे.

ब) अध्यक्षपद भुषविलेल्या सर्व सभांच्या इतिवृत्तावर सह्या करणे.

क) एखाद्या ठरावावर सभेमध्ये समान मते पडल्यास अशा ठरावावर निर्णायक मत देणे. (कास्टिंग मत)

ड) संचालक मंडळ, कार्यकारी समिती व इतर सभांचे आयोजन करणे.

इ) स्वत: असलेल्या अधिकारामधील काही अधिकार उपाध्यक्षांना प्रदान करणे.

फ) अध्यक्ष संचालक मंडळाचे, कार्यकारी व इतर उपसमित्यांचेवतीने तातडीचे व महत्वाचे निर्णय घेऊ शकतील. असे निर्णय संबधीत सभेच्या पुढील सभेत पुर्नमान्यतेसाठी ठेवले जातील.

२) उपाध्यक्षांना अध्यक्षांच्या गैरहजेरीमध्ये त्याचे सर्व उपरोक्त कामकाज पार पाडावे लागेल.

**४३) संचालक मंडळाचे इतिवृत्त :**

संचालक मंडळ सभेचे इतिवृत्त त्यासाठी ठेवलेल्या स्वतंत्र इतिवृत्त पुस्तकात नोंदविणे आवश्यक आहे. सदर इतिवृत्तावर पुढील संचालक मंडळ सभेच्या अगोदर अध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सह्या कराव्यात व पुढील सभेत इतिवृत्त कायम करण्यात यावे. अशा प्रकारचे सह्या केलेले व मोहोर केलेले इतिवृत्त सभेमध्ये झालेल्या कामकाजाचा अचूक पुरावा म्हणून समजले जाईल.

**४४) संचालक मंडळाचे अधिकार व कार्ये :**

१) संचालक मंडळास बँकेचे कामकाज विविध कायद्याअंतर्गत सुरळित व व्यवस्थितपणे पार पाडण्यासाठी आवश्यक असलेले सर्व अधिकार आहेत.

२) कोणत्याही सर्वसाधारण अधिकारांना बाधा न आणता संचालक मंडळास असलेले अधिकार खालीलप्रमाणे -